भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

सुलभ ओवीबद्ध रचना

अध्याय अठरावा , भाग दुसरा



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा : भाग दुसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

वा एखाद्याने रुसून । द्वारकेच्या वाटेस लागणं । मग द्वारकेस ते पोहचणं । दूर नाही ॥३६९॥
तैसे कार्यकारणा कारण । येथे कर्माचं रहाटणं । ते कार्यकारण जाणणं । अनिवार्य की ॥३७०॥
न जाणता कार्यकारण । जर कर्माचं घडे रहाटणं । अज्ञानात कर्माचं रहाटणं । योग्य नाही ॥३७१॥
चोरीस जाता धन । ते न होतसे दान । तैसे अज्ञानी कर्म घडणं । वायाचि की ॥३७२॥
बावन्न वर्ण सोडून । असे का मंत्र कोण । बावन्न वर्णांचं उच्चारणं । सर्वांठायी ॥३७३॥
पण स्वर ते जाणून । मंत्रांची रचना करणं । तेव्हाच फल ते लाभणं । घडे तेथे ॥३७४॥
तैसे न जाणता कार्यकारण । अर्जुना कर्मी रहाटणं । मग मोक्षाचे प्रकटन । नाही तेथे ॥३७५॥
कर्म घडत असता । त्याचे कार्यकारण जाणता । प्रकटते बा मोक्षता । अर्जुना माझ्या ॥३७६॥
ऐसे हे कार्यकारण । आणि कर्माचं रहाटणं । मग आत्मतत्त्वाचं सापडणं । कर्माच्या ठायी ॥३७७॥
स्वत: न पाहताही जैसे । सूर्य चक्षुद्वारे रूप प्रकाशे । अकर्ता असूनही आत्मा । तैसे प्रकटवी कर्म ॥३७८॥
आरशाने जसं काही न करणं । परि होतसे प्रतिबिंब प्रकटन । तैसे कर्माचं घडणं । आत्म्याठायी ॥३७९॥
सूर्याने न करता काही । घडे दिवस रात्रीची नवलाई । तैसे कर्म कर्त्याचा भास होई । आत्म्याठायी ॥३८०॥
त्या देहाभिमानाकारण । मी देह असे वाटणं । मग आत्म्याचे ते विस्मरण । जिवासी होई ॥३८१॥
विस्मरता चैतन्य ईश्वर ब्रह्मास । होतो `मी देह` असा भास । मग कर्तेपणाचा आभास । जिवाठायी ॥३८२॥
ऐसे आत्मतत्त्वाचे विस्मरण । तयाकारणे अहंचे प्रकटन । मग स्वत:स कर्ता मानणं । घडे तेथे ॥३८३॥
मी आत्मा कर्तातीत । सर्व कर्माचा साक्षीभूत । हे सत्य अर्जुना विस्मरत । तो जीव होई ॥३८४॥
स्वत: असूनही अमाप अनंत । तो आपणास देह असे मानत । घुबड नाही का समजत । रात्रीला दिवस ॥३८५॥
न जाणता सूर्याला । सूर्य मानणे डबक्यातील प्रतिबिंबाला । ऐसाच प्रकार बा घडला । जीवाचे ठायी ॥३८६॥
मग डबके असेपर्यंत । अर्जुना प्रतिबिंब असे दिसत । आणि प्रतिबिंब असे संपत । संपता पाणी ॥३८७॥
जोवरी जाग नाही येत । तोवरीच स्वप्न खरं वाटतं । जसा सर्पाभास असे होत । नेणता रज्जू ॥३८८॥
अर्जुना होता ती कावीळ । दिसतं सर्व जग पिवळं । जशी हरणासी पडते भुरळ । मृगजळापायी ॥३८९॥
शास्त्र गुरूच्या नावानं । अर्जुना जो शून्य असणं । व्यर्थच तयाचं जगणं । अज्ञानाकारण ॥३९०॥
देहात्मदृष्टी झाल्याकारणे । आत्म्याठायी देहाभास होणे । जसे ढगाच्या वेगा कोल्ह्याने । चंद्राचा मानणे ॥३९१॥
स्वत:स देह मानल्याकारण । तो देहात जातसे अडकून । मग कर्मबंधी अडकणं । स्वभाव त्याचा ॥३९२॥
जशी शुक नलिकेची गोष्ट । पंख विसरून जाई पोपट । धरून नलिकेस त्या घट्ट । बंधनी पडे ॥३९३॥
अर्जुना जे घडे प्रकृतीकारणे । ते मीच केले म्हणे । मग कोटी जन्म घेणे । नशीब त्याचे ॥३९४॥
आता कर्मामाजी असे । परि तयाते कर्म न स्पर्शे । समुद्र अग्नी ठायी जैसे । समुद्रोदक ॥३९५॥
तैसे त्या वेगळेपणे । जयाचे कर्मी रहाटणे । तो ओळखावा कवणे गुणे । सांगतो आता ॥३९६॥
मनी मुक्तीची इच्छा प्रकटता । अर्जुना लाभते मुक्तता । तैसे स्वत:चा शोध होता । लाभतो मोक्ष ॥३९७॥
तैसे सजग साक्षी होता । आपलेच संस्कार अनुभवता । प्रकटते ती ब्रह्ममयता । आपोआप ॥३९९॥
जे जाहले आहे विस्मृत । ते संत उपदेशात असे सापडत । म्हणून रहावे संत संगतीत । सदैव अर्जुना ॥४००॥
निष्काम कर्म करता । मनी समत्त्व ठेवता । निरसते ती कर्मबंधता । आपोआप ॥४०१॥
ऐसा जो सुटला बंधनातून । आता ऐक तयाचे वर्णन । सांगतो संपूर्ण समजावून । अर्जुना तुजला ॥४०२॥
अविद्येच्या त्या निद्रेत । विश्वाभास होता भासत । जो भवचक्री होता फिरत । अज्ञानाकारणे ॥४०३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तो महावाक्याकारण । गुरुकृपेच्या त्या प्रतापानं । श्री गुरूंनी मस्तकी हात ठेवून । जागवला त्यासी ॥४०४॥
गुरुकृपा ती होता । झाली विश्वाभासाची सांगता । अद्वैता प्राप्त होता । ज्ञान झाले ॥४०५॥
मग विश्वाचं ते भासणं । जे मृगजळाचच असणं । ते गेले बा संपून । ब्रह्ममय होता ॥४०६॥
बालकत्व जाता निघून । बागुलबुवास नाही स्थान । जसे जळून जाता इंधन । न उरे काही ॥४०७॥
जाग आलीया पाठी । ते स्वप्न न दिसे दिठी । तैसे अहंममता किरिटी । नुरेचि तया ॥४०८॥
जसा सूर्याच्या ठायी । अंधाराचा पत्ताच नाही । तैसा अहंममतेचा स्पर्श नाही । तयासी अर्जुना ॥४०९॥
आत्मतत्त्वी एकरूप होता । न उरे द्रष्टा-दृश्याचा पत्ता । मग दर्शनाचाच राबता । सर्वदूर ॥४१०॥
जैसे अग्नी जयालागे । तो अग्नीच होय अंगे । मग दाह्यदाहक विभागे । उरे कैसे ॥४११॥
अर्जुना कर्माच्या त्या कारण । मी-पणाचं जे भासणं ।ते कर्मचि गेल्या निरसून । उरे जे काही ॥४१२॥
आत्मतत्त्वाची होता प्राप्ती । होते जीवभावाची समाप्ती । जशी ओढ्याची ती गती । प्रलयकाळी ॥४१३॥
ब्रह्ममयतेचे होता प्रकटन । संपते जिवाचे जीवपण । जसं सूर्य तो न मावणं । मुठीमाजी ॥४१४॥
जसे दही ते घुसळता । होते लोण्याची प्राप्यता । मग काहीही करू जाता । न मिसळे ताका ॥४१५॥
जसा काष्ठगत तो अग्नी । एकदा उठता पेटूनी । उरते का काष्ठाची निशाणी । तैसे अर्जुना ॥४१६॥
जसे रात्रीच्या नंतर । जेधवा उगवतो भास्कर । मग रात्रीचा अंधार । उरतो का कधी ॥४१७॥
तैसे ते द्रष्टा दृश्यपण । अर्जुना जाता ते संपून । मग मी आणि माझेपण । उरेचिना ॥४१८॥
अर्जुना जसे ते आकाश । सर्वत्र करतसे वास । कोठेही जाण्याचा प्रयास । नाही तेथे ॥४१९॥
जे जे काही आहे । ते तोचि आहे स्वभावे । मग काही करावे अथवा मिळवावे । वाटेच ना ॥४२०॥
सर्वत्र जसे गगन । समुद्राने प्रवाहित न होणं । ध्रुवाने अचल ते असणं । तैसे अर्जुना ॥४२१॥
ऐसे आत्मबोधाकारण । अहंभाव जाई संपून । परि संचिताच्या कारण । चालतसे देह ॥४२२॥
जरी वादळ गेले ओसरून । तरी चालेच झाडाचं हालणं । वा करंडीस वास तो येणं । संपताही कापूर ॥४२३॥
जशी मैफल गेली संपून । पण तंद्रीच न उतरणं । वा जमिनीत ओल ती उरणं । आटता प्रवाह ॥४२४॥
जसा सूर्य मावळल्यावर । असे संध्या प्रकाशाचा वावर । तैसे संचिताकारणे व्यवहार । तयाचे ठायी ॥४२५॥
लक्ष भेदलियाहीवरी । बाण धावेचि तंववरी । गती भरली असे उरी । जोवरी अर्जुना ॥४२६॥
ते मडके तयार झाल्यावर । चाकावरून दूर करी कुंभार । तरी चाक फिरेच गरागर । तैसे अर्जुना ॥४२७॥
तैसे संपूनही देहाभिमान । कर्म देहाठायी घडणं । ते संचिताच्याच कारण । घडे अर्जुना ॥४२८॥
जसं स्वप्नाचं ते पडणं । गवताचं जमिनीवर उगवणं । वा ढगांचे ते प्रकटन । आकाशी अर्जुना ॥४२९॥
तैसे आत्मतत्त्वाने केल्यावीण । त्या कार्यकारणा कारण । घडे अस्तित्वाचं प्रकटन । आपोआप अर्जुना ॥४३०॥
पूर्व संस्कारांच्या कारण । देहमनाचं प्रकटन । मग कर्माचं ते रहाटणं । आपोआप ॥४३१॥
त्या संस्कारांच्या कारण । घडे जन्म आणि मरण । मग भवचक्राचं ते चालणं । अखंड की ॥४३२॥
कमल का कोमजते । वा ते का विलसते । ही विवंचना जशी नसते । सूर्यासी अर्जुना ॥४३३॥
विजांच्या त्या वर्षावात । पृथ्वीच्या ठिकऱ्या का उडेनात । अथवा हिरवेगार का होवोत । जगत सारे ॥४३४॥
असणे अथवा नसणे । आकाश जसे न जाणे । तो तसा विदेहीपणे । वावरे जगी ॥४३५॥
जशी जाग ती येता । होते स्वप्नांची सांगता । तैसी पृथकपणाची व्यथा । नाही तेथे ॥४३६॥
अर्जुना बद्ध जे देहात । नि आंधळे अज्ञानात । तयांना हा कर्मात । अडकला भासे ॥४३७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसे शेतातले बुजगावणे । कोल्हा ते सत्य माने । तैसे अज्ञानाकारणे । भास त्यांना ॥४३८॥
युद्धात जो मेला । जखमेची जाणीव न तयाला । ठाऊक न जसे वेड्याला । नागवेपण ॥४३९॥
पतिव्रतेचे सती जाणे । जगासी ते कठीण वाटणे । पण अग्नीची जाणीव नसणे । पतिव्रते जैसी ॥४४०॥
तैसे स्वरूपात जो जागला । द्रष्टा दृश्यासह आटला । मग तो पृथकपणाला । दुरावेच की ॥४४१॥
जसे त्या सागरात । नद्या अर्जुना सामावतात । तसा हा एकत्व असे अनुभवत । विश्वासी अर्जुना ॥४४२॥
जसे सागराच्याठायी । पाण्यावीण नाही काही । तया चैतन्यी एकरूप होई । चैतन्य हा ॥४४३॥
जसे विविध सुवर्णालंकारात । सुवर्णच असे बा वसत । तसे संपूर्ण या विश्वात । चैतन्यच की ॥४४४॥
येथे जे काही भासतं । ते चैतन्यच की असतं । चैतन्यावीण काहीच नसतं । येथे अर्जुना ॥४४५॥
चित्रातले अग्नी जल । जरी ते खरं भासलं । तेथे उष्णता वा ओल । दोन्ही नाही ॥४४६॥
तैसे मुक्ताच्या देहाने । संस्काराकारणे हालणे । जन न जाणुनी अज्ञानपणे । कर्ता म्हणती ॥४४७॥
जाग्रत स्वप्न सुषुप्तीत । केला जीवभावाचा घात । पण केली मी ही मात । न म्हणे कधी ॥४४८॥
तयाच्या त्या अंतरात । दुजाभावच नसे उरत । होऊनी द्वैताचा अंत । तोचि उरे ॥४४९॥
अर्जुना तयाच्या मनात । पापपुण्य नसे उरत । गंगा का असे विटाळत । अर्जुना कधी ॥४५०॥
आगीत मिसळता आग । आगीला न लागे धग । तैसे स्वयेचि तो जग । जाहला असे ॥४५१॥
जाणुनी चैतन्याचे वर्म । स्वयेचि जाहला जो कर्म । तेथे द्वैताचा धर्म । उरेचिना ॥४५२॥
म्हणून कर्म कर्ता क्रिया । हे स्वरूपचि जाहले जया । नाही शरीरादिका तया । कर्मबंध ॥४५३॥
जीव कर्ता होऊन । पंचभुतांच्या सहाय्यानं । दहाही इंद्रियांतून । कर्म करी ॥४५४॥
मग राग द्वेषाकारण । नवीन कर्मसंस्कारांचं बनणं । मग जीवभाव दृढ होणं । घडे तेथे ॥४५५॥
कर्माच्या या धामा । सहाय्य नसे आत्मा । म्हणू नको या उपक्रमा । मदत करी ॥४५६॥
जो स्वयेचि साक्षीस्वरूप । तेथे कैचा कर्माचा संकल्प । कर्माचा प्रवाह आपोआप । कर्माकारणे ॥४५७॥
पहा सर्व या विश्वात । कर्म प्रवृत्ती असे दिसत । पण कर्मी आत्मतत्त्वाचा हात । नसेच काही ॥४५८॥
जो केवळ साक्षी होऊन । राही स्वस्वरूपात मग्न । तया कर्माचे ते बंधन । घडे कैचे ॥४५९॥
परि अज्ञानाचे कारण । होई भासांचे प्रकटन । तेच अर्जुना त्रिपुटी म्हणून । प्रसिद्ध की ॥४६०॥
जे ज्ञान ज्ञाता ज्ञेय । हे जगाचे बीजत्रय । कर्मप्रवृत्ती ती नि:संदेह । त्रिपुटीच्याच कारण ॥४६१॥
आता या तिघांना । वेगळे करून अर्जुना । चल जाणू या तयांना । स्पष्टपणे ॥४६२॥
अर्जुना त्या जीवभावानं । पहा पंचेद्रियांच्या कारण । बाहेर विषयांकडे धावणं । भवचक्र आहे ॥४६३॥
अथवा रथरुपी जिवानं । इंद्रियरुपी घोडे दौडवून । विषयभोग भोगणं । बंधन की ॥४६४॥
या इंद्रियांच्याच कारण । होते सुखदु:खाचे प्रकटन । आणि सुषुप्तीस ओलांडणं । ज्ञान आहे ॥४६५॥
सुषुप्तीचा जो भाव । तयाचं जीव हे नाव । सुषुप्तीपलीकडील गाव । ज्ञान की ॥४६६॥
त्या अविद्येच्या पोटी । ज्ञान स्वत:स तीन भागी वाटी । मग ज्ञान ज्ञाता ज्ञेयाची दाटी । जिवाठायी ॥४६७॥
त्या ज्ञेयाच्याच कारणे । ज्ञातेपणाचा भास प्रकटणे । तेच बा द्वैताचे बुजगावणे । अहं की ॥४६८॥
ज्ञाता ज्ञेया कारण । होई द्वैताचं प्रकटन । मग भवचक्राचं चालणं । द्वैताकारणे ॥४६९॥
ज्ञेयास भिन्न समजून । ज्ञाता करे ज्ञेयाचे मूल्यांकन । हीच अविद्या जाण । अर्जुना तू ॥४७०॥
स्वत:स भिन्न मानून । स्वत:सीच प्रतिक्रिया करणं । हेच अविद्या बंधन । ज्ञात्याठायी ॥४७१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आता ज्ञेयाचे वर्णन । घे अर्जुना तू ऐकून । पंचविषयांचं आभासणं । ज्ञेय आहे ॥४७२॥
भिन्न इंद्रिया कारण । भिन्न अनुभव येणं । तेच ज्ञेय म्हणून । प्रसिद्ध अर्जुना ॥४७३॥
एकच ज्ञेय असून । पाच इंद्रियांच्या कारण । पाच प्रकार भासणं । घडे अर्जुना ॥४७४॥
जसे नदीचे ते धावणे । समुद्री थांबून जाणे । वा गवताची वाढ खुंटणे । बीज ते येता ॥४७५॥
तैसे त्रिपुटी पूर्ण होऊन । जे अनुभवाचं भासणं । तेच अर्जुना जाण । ज्ञेय तू ॥४७६॥
त्या अनुभवा कारण । अनुभवणाऱ्याचा भास होणं । आणि अनुभवाचच मूल्यांकन । जीवभाव की ॥४७७॥
जे शब्दादिविषय । हे पंचविध जे ज्ञेय । ते प्रिय वा अप्रिय । वाटती जीवा ॥४७८॥
ज्ञान ज्ञाता ज्ञेयाकारण । जीवभावाचं ते भासणं । मग रागद्वेषाचं प्रकटन । जिवाठायी ॥४७९॥
माशासी पाहून बक । द्रव्य देखोनी रंक । वा स्त्री देखोनी कामुक । अधीर जैसा ॥४८०॥
जसे उताराकडे धावे पाणी । भ्रमरा पुष्पाची ओढणी । जशी वासराची धावणी । गायीच्याकडे ॥४८१॥
स्वर्गीचे भोग इच्छून । जसं त्या लोभी माणसानं । पृथ्वीवर यज्ञयाग करणं । अखंडित ॥४८२॥
जशी पारव्याची गोष्टी । चढला नभाचिये पोटी । परि पारवी देखोनी लोटी । क्षणार्धात ॥४८३॥
ढगांचा गडगडाट ऐकून । जसं मोराचं ते नाचणं । तैसे ज्ञेयाच्या कारण । धावे ज्ञाता ॥४८४॥
म्हणोनी ज्ञान ज्ञेय ज्ञाता । हे त्रिविध गा पांडुसुता । तेचि या कर्मा समस्तां । कारण येथे ॥४८५॥
जीवभावाच्या कारण । ज्ञेय जे प्रिय वाटणं । तया भोगावया धावून । जातसे जीव ॥४८६॥
आणि जर कदाचित । अप्रिय असे प्रकटत । वाटतसे पहा युगांत । तयाच्या मना ॥४८७॥
साप आणि हारा । भेट जालिया नरा । हर्ष दु:खाचा वारा । सवेचि प्रकटे ॥४८८॥
अहंपणाच्या कारण । ज्ञेय प्रिय अप्रिय वाटणं । तेच रागद्वेषाचं प्रकटन । जिवाच्या ठायी ॥४८९॥
बरोबरीचा प्रतिस्पर्धी पाहून । जसं मल्लानं पुढ सरसावणं । तैसा रागद्वेषाकारण । सरसावे हा ॥४९०॥
ऐसे ज्ञातेपणातून । कर्त्याचे घडे जन्मणं । मग भोगण्याची क्रिया घडणं । अनिवार्य की ॥४९१॥
भुंग्यानेच होणे फूल । देवानेच होणे देऊळ । स्व-नेच स्व-ला भोगण्याचा खेळ । मांडला जसा ॥४९२॥
तैसे विषयांच्या कारण । विषयीचा भास होणं । आणि स्वत:शीच रागद्वेष करणं । घडे तेथे ॥४९३॥
ऐसे मनाशीच मनानं । रागद्वेष तो मांडणं । आणि मनचक्रात अडकणं । अज्ञान की ॥४९४॥
ऐसे अज्ञानाच्या कारण । मन संमोहनात अडकणं । मग अंधाराचं प्रकटन । चोहीकडे ॥४९५॥
बा नशीब ते फिरता । संपते धनकीर्तीची वार्ता । जशी पुनवेनंतर वार्ता । चंद्रबिंबाची ॥४९६॥
तैसे अज्ञानाच्या कारण । भासते जे कर्तेपण । त्या कर्तेपणाची लक्षणं । ऐक आता ॥४९७॥
तरी बुद्धी आणि मन । चित्त अहंकार बा जाण । ते चतुर्विध चिन्ह । अंत:करणाचे ॥४९८॥
बाह्य त्वचा कान । चक्षु रसना घ्राण । हे पंचविध जाण । इंद्रिय गा ॥४९९॥
त्या विषयांच्या ठायी । विषयीचा भास होई । मग स्वत:लाच भोगण्याची घाई । घडे तेथे ॥५००॥
त्या कर्त्याच्या कारण । इंद्रियांचे बहिर्मुख होणं । आणि सत्कर्म करणं । घडे तेथे ॥५०१॥
मग दाही इंद्रियांचे दल । सतत करी कोलाहल । जोवरी कर्माचे फल । हाता न ये ॥५०२॥
त्या कर्माचे कारणे । जर झाले दु:खाचे प्रकटणे । मग त्यागाच्या दिशेने । धावत सुटे ॥५०३॥
मग फिटता दु:खाचा ठावो । तो इंद्रिया राहटवी रात्रंदिवो । राबवी प्रजेसी रावो । तैसा अर्जुना ॥५०४॥
ऐसा त्याग आणि स्वीकार । जो इंद्रियांचाच व्यापार । तोच कर्त्याचा वावर । आहे अर्जुना ॥५०५॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कर्त्याच्या त्या कारण । इंद्रियाठायी कर्म घडणं । म्हणून इंद्रियासी करण । नाव आहे ॥५०६॥
या कर्त्याच्याच कारण । होते जे इंद्रियांचे संचालन । तेच कर्म म्हणून । प्रसिद्ध की ॥५०७॥
सोनार बुद्धीच बनते अलंकार । चंद्र प्रकाशच चंद्राचे कर । का वेलीचाच विस्तार । वेल जशी ॥५०८॥
प्रभेठायी तो प्रकाश । उसात जसा गोड रस । असते बा अवकाश । आकाशी जैसे ॥५०९॥
तैसे कर्त्याठायी क्रिया । व्यापल्या ज्या धनंजया । ते प्रसिद्ध जगती या । कर्म म्हणून ॥५१०॥
एवं कर्ता कर्म करण । या तिहींचेही लक्षण । सांगितले तुज विचक्षण । शिरोमणी ॥५११॥
येथे ज्ञाता ज्ञान ज्ञेय । हेच कर्माचे प्रवृत्तित्रय । आणि कर्ता करण कार्य । हा कर्मसंचय ॥५१२॥
अग्नीत जसा धूर । बीजाठायी तरूवर । सदा मनी जसा वावर । कामनेचा अर्जुना ॥५१३॥
तैसा कर्ता क्रिया करणी । ती कर्माचीच उभारणी । जैसे सोनियाची खाणी । सोनेच की ॥५१४॥
म्हणोनी हे कार्य मी कर्ता । ऐसे जीवा वाटते पांडुसुता । पण आत्मतत्त्वाचा पत्ता । जिवासी नाही ॥५१५॥
ऐसे जीवभावा कारण । आत्मतत्त्वाचे होते विस्मरण । मग दु:खाचंच नांदणं । जिवाचे ठायी ॥५१६॥
मी सांगितले जे ज्ञान । ते कर्म आणि कर्तेपण । अर्जुना ते तीन प्रकारानं । नांदते जगती ॥५१७॥
म्हणोनि ज्ञान कर्म कर्ता । ती तीन बंधनांचीच कथा । बांधते रजतामसता । नि सोडवी सत्त्व ॥५१८॥
सात्त्विक गुणांचे वर्णन । आहे सांख्यशास्त्रात गहन । सांख्याकारणे आत्मज्ञान । सुलभ झाले ॥५१९॥
अतिसूक्ष्म जे ज्ञान । जे आत्मबोधास कारण । शास्त्रांचा सम्राट जाण । सांख्यशास्त्रा ॥५२०॥
की प्रकृत्ती पुरुष दोन्ही । जी गेली एकमेकांत मिसळोनी । तयांची ती निवडणी । सांख्य आहे ॥५२१॥
अपार मोहाची रास । जी तत्त्वे बा चोवीस । ओलांडणे त्या चोविसास । सूत्र आहे ॥५२२॥
अर्जुना ते सांख्यशास्त्र । जे आत्मज्ञानाचे स्तोत्र । तयाचे गुणचरित्र । ऐक आता ॥५२३॥
आपल्याच गुणांच्या कारण । जे त्रिगुणांचे प्रकटन । तेच दृश्य होऊन । भासते जगती ॥५२४॥
ऐसे सत्त्व रजतमात । ते सामर्थ्य असे वसत । ते किड्यापासून ब्रह्मापर्यंत । नांदते जगती ॥५२५॥
अर्जुना विश्वाचा हा भास । शक्य तयाचा निरास । पण मनी ज्ञान ते खास । उपजावे लागे ॥५२६॥
मन निष्काम होता । प्रकटते ती आत्मदिव्यता । मग सर्वत्र ब्रह्ममयता । अनुभवा येते ॥५२७॥
आता सांगतो सात्त्विक ज्ञान । द्यावे तू अवधान । मग आत्मयाचे निधान । येईल हाता ॥५२८॥
ऐक बा अर्जुना । प्राप्त होता त्या सात्त्विक ज्ञाना । मी-पणाची ती कल्पना । नुरे तेथे ॥५२९॥
जैसा सूर्य न देखे अंधार । वा नदी न जाणे सागर । तैसा ज्ञानियासी आपपर । भाव नाही ॥५३०॥
प्राप्त होता ते ज्ञान । तृण आणि शिव अभिन्न । या जगी एका ब्रह्मावीण । काही नाही ॥५३१॥
जैसे हाताने चित्र स्पर्शता । पाण्याने मीठ धुता । वा स्वप्नातून जाग येता । घडे जैसे ॥५३२॥
तैसे प्राप्त होता ज्ञान । घडे विश्वाचं निरसणं । जाता द्वैत ते विरून । अद्वैत उरे ॥५३३॥
अलंकारात जसे सोने । लाटात पाणीच ते असणे । तैसे अस्तित्व ब्रह्माने । व्यापले असे ॥५३४॥
ऐसे ज्ञान येता हाता । नुरेचि दृश्याचा पत्ता । ते ज्ञान जाण सर्वथा । सात्त्विक गा ॥५३५॥
जसे त्या आरशात । प्रतिबिंबच असे दिसत । तसे ब्रह्मच कणाकणांत । आहे अर्जुना ॥५३६॥
पुढे हेचि सात्त्विक ज्ञान । बनते मोक्षाचे कारण । आता ऐक तू लक्षण । राजसाचे ॥५३७॥
भगवंत म्हणे अर्जुनास । ते ज्ञान गा राजस । जे भेदाची कास । धरुनी चाले ॥५३८॥
त्रिपुटीच्या त्याकारण । द्रष्टा दृश्याचं भासणं । मग सर्वत्र पृथक्पण । अनुभवा येते ॥५३९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

होऊन आत्मतत्त्वाचे विस्मरण । जागते अर्जुना अहंपण । मग विश्वाभासाचं स्वप्न । पडे तेथे ॥५४०॥
ऐसे ब्रह्ममयतेच्या विपरीत । येथे भास ते प्रकटतात । मग तिन्ही अवस्थांच्या खेळात । भ्रमे जीव ॥५४१॥
जसे सुवर्णालंकार होता । बालका न उमजते सुवर्णता । तैसे नामरुपी प्रकटता । विस्मरण आत्मयाचे ॥५४२॥
जसे गाडगे घटाचं घडणं । तेथे मातीचं घडे लपणं । वा अग्नीचे ते विस्मरण । दीप पाहता ॥५४३॥
जसे वस्त्रपणाच्या आरोपे । मूर्खाप्रति तंतूपण हारपे । वा पडदा तो लोपे । दाऊनि चित्र ॥५४४॥
तैसे जिवाच्या ठिकाणी । होते पृथकपणाची प्रकटनी । मग ऐक्यबोधाच्या स्मरणी । पडे चिरा ॥५४५॥
मग इंधन आणि अग्नीस । फूल आणि सुवासास । वेगळे मानण्याचा भास । मनी त्याच्या ॥५४६॥
ऐसे जे पृथकपणाचं भासणं । तेच बा राजस ज्ञान । जे भवचक्रास कारण । अनायासे ॥५४७॥
आता टाळण्या ते वाईट । सांगतो तामस बा चोखट । तामसाची ती वाट । न चोखाळावी कधी ॥५४८॥
तरी अर्जुना जे ज्ञान । जे विधिरहित आणि वस्त्रहीन । आंतरबाह्य सात्त्विकताहीन । नग्न जैसे ।५४९॥
जे वाईटाचीच खाण । म्हणून शास्त्रांनी ते निंदून । दिले डोंगरी पाठवून । अधर्माच्या ॥५५०॥
ऐसे जे ज्ञान । जे सर्वथा तमोगुण । त्या कारण पिसे होई मन । आपोआप ॥५५१॥
ते सोयरीक न जाणे । विधिनिषेध न माने । कुत्र्याचे जसे हिंडणे । ओसाड गावी ॥५५२॥
जे काही असे दिसत । ते असे तो खात । फक्त तोंड जयाने पोळतं । तेच सोडी ॥५५३॥
जसे सोने त्या उंदरास । काय शुद्ध नि हिणकस । तसे चांगल्या वाईट फरकास । जाणेचि ना ॥५५४॥
जिवंत का मेलेले जनावर । जसा माशीस नाही विचार । तसाच याचा व्यवहार । तत्त्वहीन ॥५५५॥
अन्न जे पडलेलं दिसलं । ते वाढलेलं की ओकलेलं । हा विचार नसे बिलकुल । कावळ्या जैसा ॥५५६॥
तैसे वाईट सोडूनी द्यावे । नि फक्त चांगले घ्यावे । हे तामसाच्या स्वभावे । नाहीच काही ॥५५७॥
जे पडे त्याच्या नजरेस । धावे तो ते भोगण्यास । जिव्हा शिश्नाचा हव्यास । सदैव मनी ॥५५८॥
न जाणता चांगले वाईट । सदैव भोगण्याचीच खटपट । काय बरे काय वाईट । उमजेचि ना ॥५५९॥
इंद्रियांस जे आवडणे । सदैव त्यावर तुटून पडणे । एवढेच कर्म जाणे । बुद्धी त्याची ॥५६०॥
अखिल त्या स्त्रीजातीस । माने भोग्यवस्तू खास । भोगाचाच बा हव्यास । मनी त्याच्या ॥५६१॥
जो भोगा उपयोगी पडला । तेवढाच सोयरा त्याला । नीतीचा विसर पडला । म्हणून अंतरी ॥५६२॥
सर्व जग नाशवान । सर्व बा मृत्यूचेच धन । म्हणून जिवंतपणी घ्या भोगून । मत त्याचे ॥५६३॥
ऐसे विश्व सकळ । भोगचि मानिले केवळ । भोगाचीच तळमळ । मनी त्याच्या ॥५६४॥
आकाशातून पडणाऱ्या नीरा । जैसा सागरचि एक थारा । त्यांचा कर्माचा पसारा । पोटासाठी ॥५६५॥
पापपुण्य न मानती । स्वर्ग नरक न जाणती । पापाच्याच त्या रीती । जगणे त्यांचे ॥५६६॥
मी मानती देहाला । नि पाषाण ईश्वर मूर्तीला । महत्त्व देती भोगाला । सदैव अर्जुना ॥५६७॥
म्हणे येता ते मरण । भोगावया उरे कोण । भोगण्यासाठीच जगणं । वृत्ती त्यांची ॥५६८॥
देव ते विकून । जर मिळे भोग भोगणं । मग टाकती देवही विकून । बिनधास्तपणे ॥५६९॥
म्हणती गावीचे देवळेश्वर । नियामक असती खरोखर । तर देशीचे डोंगर । नियंते खरे ॥५७०॥
देव जरी तयाने मानणे । तया तो पाषणच म्हणे । देहासीच आत्मा माने । बुद्धी त्याची ॥५७१॥
पाप आणि पुण्ये । काहीच तो न माने । जसा अग्नी न जाणे । भक्षाभक्ष्य ॥५७२॥
जे डोळ्यास बा दिसते । नि इंद्रियास गोड वाटते । तेवढेच सत्य असते । मानणे त्याचे ॥५७३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जशी वाढ धुराच्या वेलीची । कामाची न धामाची । तैसीच गत ज्ञानाची । यांच्या अर्जुना ॥५७४॥
कोरडे असो की वाळलेले । झाड भेंडीचे वाया गेले । जागीच जे मोडले । वजन देता ॥५७५॥
उसाचे ते तुरे । आणि नपुंसकाचे नखरे । वायाच जे सारे । साबरी जैसे ॥५७६॥
बालकाचे ते मन । का चोराघरचे धन । जैसे शेळीचे ते स्तन । व्यर्थ अर्जुना ॥५७७॥
तैसे वायाच जे ज्ञान । अज्ञानाची जी खाण । तयासीच बा तामस ज्ञान । नाव अर्जुना ॥५७८॥
तया ज्ञान ते म्हणणे । ते ऐशा भावाकारणे । आंधळ्यास डोळा असणे । व्यर्थ जैसे ॥५७९॥
का बधिराचे नीट कान । मद्याला म्हणती पान । तैसे नाव ज्ञान । तामसा या ॥५८०॥
हे असो किती बोलावे । तरी ऐसे जे देखावे । ते ज्ञान न समजावे । कल्याणाचे अर्जुना ॥५८१॥
ऐसे तिन्ही गुणांचे लक्षण । दिले तुजला समजावून । त्या तिन्हींना जाणणं । अनिवार्य की ॥५८२॥
ऐशाच त्या रीतीनं । कर्माचेही प्रकार तीन । तयांचे ते वर्णन । ऐकावे आता ॥५८३॥
उताराच्या त्या दिशेने । पाण्याचे जसे वाहणे । तैसेच कर्माचे घडणे । तीन प्रकारे ॥५८४॥
ज्ञानाच्या तीन प्रकाराकारण । कर्माचेही प्रकार तीन । प्रथम सात्त्विकाचे लक्षण । ऐकावे अर्जुना ॥५८५॥
आपल्याच त्या कर्माकारण । फलाचे जे प्रकटन । ते घ्यावे स्वीकारून । पतिव्रते जैसे ॥५८६॥
आपल्या स्वधर्माप्रमाणे । आपुले नित्यकर्म करणे । पण कर्मी निष्काम राहणे । सूत्र आहे ॥५८७॥
नित्यकर्म भले । आणि नैमित्तिकही जोडले । ते सोनिया लाभले । सुगंध जैसे ॥५८८॥
जीवप्राणा अतिते । बाळ ती सांभाळते । पण कधी का उबगते । अर्जुना माय ॥५८९॥
तैसे निष्काम ते राहून । स्वाभाविक कर्म करून । ब्रह्ममयता अनुभवणं । ज्ञान आहे ॥५९०॥
त्या सत्क्रियेकारण । जरी अर्जुना गेला प्राण । तरी माघारी न फिरणं । ध्यान आहे ॥५९१॥
मनाविरुद्ध ते घडता । द्वेष न यावा चित्ता । नि मनाप्रमाणे घडता । न व्हावा हर्ष ॥५९२॥
अशी युक्ती धरून । अर्जुना जे कर्म करणं । तेच कर्म सात्त्विक म्हणून । प्रसिद्ध जगती ॥५९३॥
राजस कर्माचे लक्षण । ऐक बा लक्ष देऊन । मनी समता नि अवधान । असावे सदैव ॥५९४॥
मातापित्यास लाथाडून । जगास आदर देणं । ते मूर्खपणाचं वागणं । अर्जुना माझ्या ॥५९५॥
का तुळशीचिया झाडा । न देई जलाचा शिंतोडा । आणि द्राक्षवेलीच्या बुडा । घाली दूध ॥५९६॥
नित्य नैमित्तिक कर्मे ती । राजसा न आवडती । मुक्तीची ती मती । नाही तेथे ॥५९७॥
स्वार्थी इच्छांच्या कारण । त्याने सर्वकाही करणं । सोसून कोणतेही नुकसान । करी इच्छापूर्ती ॥५९८॥
आवड दिढी व्याजाची । मग वाटप होते कर्जाची । दगदग का पेरणीची । वाटते कधी ॥५९९॥
हाती येता परीस । निघावे लोहाच्या खरेदीस । ऐसे तयाचे मानस । अति लोभी ॥६००॥
ऐसा अडकून लोभात । करी कर्म तो सतत । आणि कधीच नसे थकत । मेला जरी ॥६०१॥
ऐसे इच्छांच्याकारण । तयाने सदैव कर्म करणं । तयाच्या कर्मात उणेपण । नसेच कधी ॥६०२॥
आणि जे काही करतो । तयाची दवंडी सदैव पिटतो । सर्वत्र उदो उदो करतो । आपलीच अर्जुना ॥६०३॥
ऐसा तयाचा अहंकार । न मानी पिता वा गुरुवर । जसा मृत्यूचा वावर । न जुमाने औषधा ॥६०४॥
ऐसे स्वार्थाच्याकारण । फलाची इच्छा धरून । सदैव कष्ट करणं । राजसी अर्जुना ॥६०५॥
जैसे कोल्हाट्याचे जीवन । सदैव कष्टच करणं । आणि कष्टातच मरणं । नशिबी त्यांच्या ॥६०६॥
एका कणांसाठी उंदीर । अर्जुना उपसतो डोंगर । वा बेडूक ढवळे सागर । शेवाळासाठी ॥६०७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसे त्या गारुडयाने । जिवंत साप खेळवणे । पण पोटापुरतेही मिळणे । कठीण त्याला ॥६०८॥
कणाची आस धरून । वाळवीने पाताळी जाणं । तैसे स्वर्गसुखाच्या कल्पनेनं । श्रमे सदैव ॥६०९॥
ऐसे सकाम कष्ट करणं । तेच राजसाचे लक्षण । आता ऐक ते चिन्ह । तामसाचे ॥६१०॥
तयास म्हणती तामस कर्म । जे निंदेचे काळे धाम । निषेधात्मक ते कर्म । तामसी अर्जुना ॥६११॥
दुष्ट बुद्धीच्याकारण । निषिद्ध कर्म करणं । वाईटच फल निष्पन्न । तामसापोटी ॥६१२॥
का कांजी ती घुसळणे । अथवा राखोंडी फुंकणे । वा वाळू घाण्यात टाकणे । व्यर्थ जैसे ॥६१३॥
भूस वाऱ्यावर उडवणे । आकाशा बाण मारणे । वा वारा मुठीत पकडणे । व्यर्थ की ॥६१४॥
हे अवघेचि जैसे । वांझ होऊनी नाशे । जे करताही तैसे । वाया जाय ॥६१५॥
हा देहही असे मरत । धन तेही असे सरत । सर्वत्र दु:खच असे वसत । येथे अर्जुना ॥६१६॥
जसे काटयाच्या संगतीत । कमळ असे बा फाटत । तैसे दु:खच बा प्रकटतं । तामसासंगे ॥६१७॥
जैसा पतंग स्वत: जळे । आणि नागवी जगाचे डोळे । तैसे कर्म ते काळे । तामसी अर्जुना ॥६१८॥
तैसे सर्वस्व वाया जावो । वर देहही कामा येवो । पण पुढीला करणे अपावो । उद्देश त्याचा ॥६१९॥
माशी स्वत:सीच गिळवी । आणि पुढीला वांती करावी । तैसे जे वाईटच प्रकटवी । ते तामस अर्जुना ॥६२०॥
करण्या कर्म वाईट । मागेपुढे नसे पहात । आणि सदैव असे चिंतीत । वाईट अर्जुना ॥६२१॥
स्वत:च सामर्थ्य न पाहता । भविष्याचा विचार न करता । अविवेकाचा तो राबता । सदैव तेथे ॥६२२॥
अविवेकाच्या त्या कारण । मनी अभिमान धरून । वाईटच कर्म करणं । तामसी अर्जुना ॥६२३॥
स्वत:च जैसा जळूनी । इतरा जाळे अग्नी । तैसे स्वत:चे वाईट करुनी । छळे इतरा ॥६२४॥
न जाणता बहु थोडे । न पाहता मागे पुढे । वाजवी दुष्कर्माचे चौघडे । सदैव अर्जुना ॥६२५॥
नसे योग्य अयोग्याचा विचार । तो नच जाणे आपपर । ऐसा कुबुद्धीचा वावर । तयाचे ठायी ॥६२६॥
ऐसे कर्मप्रकार तीन । आणि तयांची लक्षणं । ऐकलीस तू विस्तारून । अर्जुना माझ्या ॥६२७॥
ऐसे त्रिविधपणे कर्म घडता । बने त्रिविधच तो कर्ता । त्या जिवाची त्रिविधता । ऐकावी आता ॥६२८॥
जसे त्या चार आश्रमांत । एकच पुरुष असे वावरत । तैसा कर्ता असे दिसत । त्रिविधपणे ॥६२९॥
त्या कर्माच्या कारण । कर्त्याचं त्रिविध ते भासणं । होऊन तू सावधान । ऐकावे आता ॥६३०॥
जैसे मलयगिरीच्या चंदनानं । फलइच्छा ती सोडून । सरळसोटपणे वाढणं । तैसे अर्जुना ॥६३१॥
जसं ते सार्थक होणं । फल न करता धारण । अर्जुना त्या नागवेलीनं । तैसेच की ॥६३२॥
नागवेलीस फळ न लागणे । ती का विफलता असणे । नागवेलीस पान येणे । तेच फळ की ॥६३३॥
कर्म आदरे करे खूपसे । परि कर्तेपण मनी नसे । ते वर्षाकाळीचे जैसे । ढग अर्जुना ॥६३४॥
तैसे आत्मतत्त्वा कारण । सदैव कर्मरत ते राहणं । नि फळ करणे ते अर्पण । परमात्म्यालागी ॥६३५॥
योग्य मुहुर्त पाहून । स्थलशुद्धी ती करून । शास्त्रानुसार ते वर्तन । तयांचे अर्जुना ॥६३६॥
वृत्ती एकाग्र करुन । फलेच्छा ती सोडून । यम नियम पाळणं । धर्म त्यांचा ॥६३७॥
ऐसे जिंकण्या ते मन । धैर्य मनी बा धरून । सदैव कर्म करत राहणं । स्वभाव त्यांचा ॥६३८॥
आत्म्याच्या आवडीकारण । भूक तहान विसरून । मन इच्छेस उल्लंघणं । आवडे तया ॥६३९॥
निद्रा ती न घेता । तमा भुकेची न बाळगता । सदैव सावधान राहता । आत्मप्राप्ती ॥६४०॥
जैसे ते अर्जुना सोने । जितके जितके तापवणे । तितके अधिक शुद्ध होणे । तैसे अर्जुना ॥६४१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पतीच्या अतिप्रेमाकारण । जसं त्या सतीनं । सहज चितेत जळणं । तैसे अर्जुना ॥६४२॥
तैसे आत्मतत्त्वाच्या ओढीकारण । सर्व दु:ख ते झेलून । देह मना जाई ओलांडून । सहज तो ॥६४३॥
विषयांची गोडी तुटे । तैसी देहबुद्धी आटे । मग अधिकच आनंद दाटे । अंतरी त्याच्या ॥६४४॥
ऐसे सदैव कर्म करी । आणि कोणे एके अवसरी । ते कर्म थांबले तरी । नाही खंत ॥६४५॥
जसं त्या उतारावरून । गाड्याने गडगडत मोडणं । परि खंत न वाटणं । तया कधी ॥६४६॥
आणि कर्म जे केले । ते सिद्धीस जरी गेले । तरी गर्विष्ठ न जाहले । मन कधी ॥६४७॥
या खुणा कर्म करता । दिसती जेथे पांडुसुता । तोच सात्त्विक तत्त्वता । कर्ता म्हणिजे ॥६४८॥
आता राजसाची लक्षणं । घे अर्जुना तू ऐकून । असंख्य अभिलाषा असणं । मनी त्याच्या ॥६४९॥
जसा उकिरड्याच्या ठिकाणी । सर्व कचरा येतो धावुनी । का त्या स्मशानी । भुते जैसी ॥६५०॥
तैसे कर्तेपणाकारण । तो सर्व अभिलाषांची खाण । आणि कर्मीच रहाटणं । नशीब त्याचे ॥६५१॥
फलेइच्छांच्या कारण । तो सर्व अभिलाषांची खाण । आणि कर्मातच रमणं । आवडे तया ॥६५२॥
कीर्ती आणि धन । तयाचा जीव की प्राण । जीव टाके तो ओवाळून । धनासाठी ॥६५३॥
जसा बा तो कृपण । धन तया जीव की प्राण । जसा बगळा बसे टपून । माशासाठी ॥६५४॥
जसं आंबट त्या बोरीनं । सर्वांचं तोंड आंबट करणं । तैसे सर्वा दु:ख देणं । स्वभाव त्याचा ॥६५५॥
तैसे मन वाचा काये । सर्वांनाच दुखवीत जाये । स्वार्थापायी न पाहे । जिवाचे हित ॥६५६॥
स्वार्थाच्या त्याकारण । अक्षम्य कर्म करणं । चांगलं वाईट न पाहणं । घडे तेथे ॥६५७॥
धोत्र्याच्या त्या फळाते । आत विष बाहेर काटे । तैसे कर्म ते खोटे । तयाचे अर्जुना ॥६५८॥
आणि कर्म सिद्ध होता । वाढे याची अहंता । पुढे कुकर्माची कथा । घडे तेथे ॥६५९॥
अथवा जे कर्म केले । ते जर फलहीन झाले । मग स्वत:सीच धिक्कारले । तयाने अर्जुना ॥६६०॥
ऐशा कर्माची लक्षणं । जयाच्या ठिकाणी प्रकटणं । तोच अर्जुना जाण । राजसी कर्ता ॥६६१॥
आता कुकर्माचा आगर । करू तयाचा विचार । पाहू या तो सविस्तर । तामसी कर्ता ॥६६२॥
मी लागल्यास कैसे । पुढीलांचे अंग जळत असे । हे न जाणे जैसे । अग्नी अर्जुना ॥६६३॥
मजकारणे जखम होते । हे शस्त्रा नसे ठाऊक ते । विष का कधी जाणते । विषपण आपुले ॥६६४॥
तैसे आपल्या त्या कारणे । दुसऱ्याचा घात होणे । परि तामसी न जाणे । ते कधी ॥६६५॥
कुकर्म ते करता । नाही जराही चिंता । जसे वादळाची चेष्टा । न जाणे वादळ ॥६६६॥
आपल्या त्या कुकर्मास । न जाणे तो तामस । वाढवणे त्या अधर्मास । स्वभाव त्याचा ॥६६७॥
जैसे गोचीड तो जाणे । केवळ बैलाचे रक्त पिणे । तैसे केवळ इंद्रियांचे भोगणे । ठाऊक तया ॥६६८॥
जैसे लहान मूल ते । केव्हाही हसते वा रडते । तैसे याचे वागणे ते । लहरी अर्जुना ॥६६९॥
मायेच्या अधीन होऊन । योग्य अयोग्य न जाणणं । जसा केवळ कचराच असणं । उकिरड्या ठायी ॥६७०॥
गर्वाच्या त्या कारण । ईश्वरा तुच्छ लेखून । कुकर्मी ते रमणं । आवडे त्याला ॥६७१॥
त्याचे मन विषयाची खाण । आवडे विषय ते भोगणं । आणि वेश्येच्या समान । वर्तणूक त्याची ॥६७२॥
त्याच्या देहाच्या आत । केवळ कपटाचाच थाट । सर्वांना फसविण्याचा घाट । मनी त्याच्या ॥६७३॥
कुकर्माचा जो प्रादुर्भाव । लुटारू तो भिल्लांचे गाव । कोणी कधी न लागावं । तयाच्या नादा ॥६७४॥
जेव्हा कोणाचं भलं होतं । वाईट याला बा वाटतं । जसे पडता मीठ दुधात । नासते दूध ॥६७५॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

थंड पदार्थाची जात । जर घातली अग्नीत । ती जळे धडधडीत । होऊनी अग्नि ॥६७६॥
सुग्रास पदार्थांच्या जाती । जेव्हा पोटात त्या जाती । मळचि होऊनी राहती । तैशा अर्जुना ॥६७७॥
तसे होता कोणाचं बरं । याचे मनी जागे मत्सर । जसं कुत्रं ते बावरं । भुंके सदा ॥६७८॥
अवघी अवगुणाची खाण । अमृतही जाई विष होऊन । जसं दुधाचं विष होणं । सापापोटी ॥६७९॥
जेव्हा येतो तो क्षण । जयात याचे बा कल्याण । तेव्हा दुर्दैव ते जागणं । नशीब याचे ॥६८०॥
तेव्हा याला आपोआप । अर्जुना येते पहा झोप । मागील कर्माचे ते पाप । आडवे येई ॥६८१॥
जसे फळांच्या हंगामात । कावळ्याचं तोंड अर्जुना येतं । दिवसा आंधळं ते होतं । घुबड जैसं ॥६८२॥
येता कल्याणाची वेळ खास । यास भरतसे तो आळस । पण कुकर्म करण्यास । उत्साही सदा ॥६८३॥
जसे सागराच्या पोटी । ती समुद्राग्नीची गोठी । तशी मत्सराचीच दाटी । अंतरी यांच्या ॥६८४॥
जसा तो विस्तवात । धूरच असे बा वसत । सदैव जशी अपानात । दुर्गंधी अर्जुना ॥६८५॥
जरी झाला तो कल्पांत । यांच्या इच्छा नसती संपत । पुन्हा व्यापार असे आरंभत । कल्पांती तो ॥६८६॥
चांगलेपणाचे नाटक करणे । पण अंतरी वाईट असणे । तयासीच मी तामसी म्हणे । अर्जुना माझ्या ॥६८७॥
एवं कर्म कर्ता ज्ञान । या तिहींचे ते लक्षण । दिले तुला समजावून । अर्जुना मी ॥६८९॥
आता अविद्येच्या गावी । जी मोह अति वाढवी । लेऊनि संदेहाची आघवी । लेणी अर्जुना ॥६९०॥
जिच्याकारणे अहंचा भ्रम । ऐसी बुद्धी जी मनोरम । त्या बुद्धीचेही काम । त्रिधा असे ॥६९१॥
नाही जयात त्रिगुण । ऐसा जगी आहे कोण । सर्वत्र त्रिगुणांचीच खाण । भरली दिसे ॥६९२॥
जयाच्या त्या पोटात । अग्नी नसे वसत । असं का लाकूड असतं । कोठे अर्जुना ॥६९३॥
ऐसे या त्रिगुणांनी । झाली असे बुद्धीची बांधणी । धृतीचीही ती वाटणी । तैसीच की ॥६९४॥
एक एक करून । करेन त्यांचे वर्णन । तयांची भिन्न लक्षण । ऐकशील आता ॥६९५॥
बुद्धी धृति दोघीतून । प्रथम ऐक बुद्धीचे लक्षण । करतो पहा स्पष्टीकरण । बुद्धीचे आता ॥६९६॥
उत्तम मध्यम निकृष्ट । ऐसा बुद्धीचा हा थाट । जन्ममरणाची ती लाट । बुद्धी कारणे ॥६९७॥
करणीय काम्य निषिद्ध । ते हे तीन मार्ग प्रसिद्ध । येथे बुद्धीचेच युद्ध । बुद्धीशी अर्जुना ॥६९८॥
जे शरीरासोबत जन्मले । नि आपोआप नशिबी आले । ते एकचि येथे भले । नित्य कर्म ॥६९९॥
प्राप्त होण्या आत्मज्ञान । सदैव असणे सावधान । अवधानी अर्जुना कर्मबंधन । तुटे येथे ॥७००॥
अवधान ठेवता कर्मात । जन्मभय असे सांडत । होतसे मोक्ष तो प्राप्त । कर्मीच अर्जुना ॥७०१॥
ऐसे करी तो भला । संसारभये जो सांडिला । कर्माद्वारेच बा पोहचला । मोक्षाठायी ॥७०२॥
तेथे जी बुद्धी ऐसा । बळेच बांधते भरोसा । मग मोक्ष तो आपैसा । प्रकटे तेथे ॥७०३॥
जयांना निवृत्तीची भीती । ते प्रवृत्तीमार्ग चोखाळती । आणि कर्मे ती करती । नित्य म्हणोनी ॥७०४॥
तान्हेल्याने पाणी पिणे । पुरात पडल्यास पोहणे । विहिरीत जशी किरणे । दावती मार्ग ॥७०५॥
औषध नि पथ्य लाभले तर । रोग्याचा जातसे ज्वर । जैसा पाणी बा आधार । माशा ठायी ॥७०६॥
तैसे तयाच्या जीविता । सुचेना काही अन्यथा । मग कर्मी इये वर्तता । जोडे मोक्ष ॥७०७॥
कशाच्या कारणे कल्याण । आणि कशाकारणे अकल्याण । याचे अंतरी असे ज्ञान । तयाला अर्जुना ॥७०८॥
ज्या कर्माच्या कारणे अकल्याण । तयाचे भय तया वाटणं । म्हणून दुष्कर्म करणं । नावडे तया ॥७०९॥
ऐसे त्या दृष्कृत्यापासून । प्रवृत्तीस दूर करून । करतसे जी कल्याण । जिवाचे अर्जुना ॥७१०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसे आगीस ते टाळणे । डोही उडी न घालणे । तप्त लोह न धरणे । हाती जेवी ॥७११॥
नागास हात न लावणे । वाघाच्या जवळ न जाणे । तैसे दृष्कृत्य तो जाणे । अकल्याणकारी ॥७१२॥
अकरणीय कर्म पाहून । भीती ती वाटणं । म्हणून दुष्कृत्य न करणं । तियेने कधी ॥७१३॥
खाता विषयुक्त अन्न । मग निश्चित ते मरण । तैसे उपजते बंधन । दुष्कृत्याकारणे ॥७१४॥
ऐसे बंधभयाकारण । ती टाळे दुष्कृत्य करणं । मग निवृत्ती मार्ग चोखाळून । मुक्त होई ॥७१५॥
ऐसे चांगले वाईट जाणून । निवृत्ती मार्ग निवडून । ती करतसे कल्याण । जिवाचे अर्जुना ॥७१६॥
ऐसी सुंदर बुद्धी । जी दुष्कृत्यापासून शुद्धी । तिलाच सात्त्विक बुद्धी । म्हणती अर्जुना ॥७१७॥
अर्जुना जी राजसी म्हणून । बुद्धी प्रसिद्ध जाण । तियेची ती लक्षणं । सांगतो आता ॥७१८॥
असे का कधी बगळ्यास । नीरक्षीर न्यायाचा अभ्यास । न समजे रात्रदिवस । आंधळ्या जैसे ॥७१८॥
जसे त्या भ्रमराने । फुलांतील मकरंद चाखणे । पण लाकूडही ते कोरणे । आवडे भ्रमरा ॥७१९॥
तैसे उचित आणि अनुचित । काहीच तया नसे समजत । काहीही असे करत । बुद्धी त्याची ॥७२०॥
डोळ्यांनी न पारखता । मोती ते विकत घेता । जशी फसण्याचीच कथा । घडते अर्जुना ॥७२१॥
दुष्कर्म ते करता । अकल्याणच होते पार्था । मग दु:खाचाच राबता । तयाच्या मनी ॥७२२॥
ऐसे बा नासमजेकारण । चांगले वाईट न जाणून । काहीही कर्म करणं । राजसी अर्जुना ॥७२३॥
जसे गर्दीचे ठिकाण । चोरासी न आवडणं । आणि दिवस तो टाळणं । चोराने जैसे ॥७२४॥
जैसे कमनशिबाच्या दैवात । धन बा नसे असत । तैसे कधीच नसे स्मरत । आत्मतत्त्व तया ॥७२५॥
तैसे अध्यात्माची बात । तया व्यर्थच असे वाटत । खऱ्यासी समझे खोटं । बुद्धी त्याची ॥७२६॥
जे असे बा योग्य । तया वाटे ते अयोग्य । केवळ विषय ते भोग्य । वाटती तया ॥७२७॥
सर्व शास्त्रातील ज्ञान । तया वाटते अज्ञान । निषिद्ध ते करणं । आवडे तया ॥७२८॥
मग कोणासही न पुसता । जाणावी तामसी ती पांडुसुता । योग्य अयोग्याची कथा । नाही तेथे ॥७२९॥
एवं बुद्धीचे ते भेद । केले तुजला मी विशद । समजावला बा स्वबोध । अर्जुना तुला ॥७३०॥
आता बुद्धीच्या नंतर । सांगतो धृति सविस्तर । हो अर्जुना तयार । ऐकावया ॥७३१॥
धृतीचे प्रकार तीन । सांगेल तुज समजावून । तयांची ती लक्षणं । ऐकावी आता ॥७३२॥
जसा उगवता दिनकर । दूर होतो तो अंधार । वा राजाज्ञेकारण अव्यवहार । थांबतो जेवी ॥७३३॥
जसा वारा सुटता जोरात । ढग नाहीसे होतात । आणि थांबतो गडगडाट । तैसे अर्जुना ॥७३४॥
जसे पाहता त्या अगस्तीस । कापरे भरे त्या सागरास । आणि चंद्रोदयाच्या समयास । मिटती कमळे ॥७३५॥
हत्तीने एकदा पाय उचलला । मग खाली नाहीच ठेवला । मग जरी समोर आला । सिंह अर्जुना ॥७३६॥
तैसा अनुपम जो धीर । तयाने व्यापता इतर । मनइंद्रियांचे ते व्यापार । थांबून जाती ॥७३७॥
ऐशा इंद्रिय विषयांच्या गाठी । आपैशा सुटती किरीटी । जेधवा अवधानाची दिठी । प्राप्त होई ॥७३८॥
त्या अवधानाच्या कारण । जसे थांबले वाटे श्वसन । तेच सुषुम्नेत प्रवेशणं । आहे अर्जुना ॥७३९॥
संकल्प विकल्पाचे लुगडे । सांडुनी मन उघडे । बुद्धी मागील बाजूकडे । बैसे उगी ॥७४०॥
ऐसे त्या धृतिकारणे । मावळती मन प्राण करणे । थांबती स्वचेष्टांची संभाषणे । तयांची अर्जुना ॥७४१॥
ऐसे मन इंद्रिय प्राणा । निष्प्रभ करून अर्जुना । जैत रे जैतची घोषणा । होतसे तेथे ॥७४२॥
ऐसी बलवान जी अथक । आत्मतत्त्व फलदायक । ती धृति सात्त्विक । समजावी अर्जुना ॥७४३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०